प्रेस नोट दिनांक २२/०८/२०१९

## चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पोलीस काका यांनी पै. तुकाराम धोंडीबा पठारे विदयालय पालक व शिक्षक यांची बैठकीमध्ये सुरक्षेसंदर्भात संवाद साधलेबाबत

दिनांक २२/०८/२०१९ रोजी १२/०० ते १३/३० वा दरम्यान वपोनि. कृष्णा इंदलकर, चंदननगर पो.स्टे. यांचे सुचनांनुसार पोलीस ठाणेहददीतील तुकाराम धोंडीबा विदयालय आणि इग्लिंश मीडीयम स्कुल मध्ये चंदननगर पोलीस काका पोलीस नाईक २६२३, अनिरुध्द जायभाये व पोना रवि आहेर यांनी मिटींगघेऊन मिटींगमध्ये पालक व शिक्षक यांना तसेच सुरक्षीततेसंबधाने, सायबर गुन्हे, लैंगीक अपराध, रॅगींग यासंबधाने चर्चा करुन मार्गदर्शन केले. त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे शंका व अडचणीचे निरसन केले. सदर मिटींग दरम्यान त्यांना पोलीस आयुक्तालयामध्ये मुलीसाठी स्थापन केलेल्या पोलीस काका, भरोसा सेलच्या योजनेची माहीती देवुन, योजनेचा उपयोग करुन घेणेसाठी मार्गदर्शन केले. महीलांसाठी १०९१ हेल्पलाईन नंबरबाबत माहीती देऊन त्यावर अडचणी कळविणेबाबत आवाहन केले. अडचणींचे दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधुन मदत मागणेसाठी माहिती दिली. सदर ठिकाणी ४० ते ५० पालक व शिक्षक हजर होते.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस काका पोलीस नाईक २६२३, अनिरुध्द जायभाये व पोना रवि आहेर यांनी केलेली आहे.

